२९

**Government Of Maharashtra**
महाराष्ट्र शासन
**Office of the Joint Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai**
उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.
विकास सेंटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.
Tel.No. 25206199/25208182 Email: didic.mumbai@maharashtra.gov.in

दिनांक :- २३.०६.२०२३.

## :- मुंबई शहर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक दिनांक १३.०६.२०२३ चे इतिवृत्त -:

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याबाबत, शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक निप्रप-२०२०/प्र.क्र. २८/ उद्योग-७, दिनांक १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आल्यानुसार मुंबई शहराकरिता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आले आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व उद्योजकांना येणा-या अडचणीचे निराकरण करण्याकरिता तसेच जिल्हयातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा, समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई शहराकरिता उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक **मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३.०६.२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजता मा. जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१. येथे संपन्न झाली.**

३. सर्वप्रथम सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करुन निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई उपनगर जिल्हयाकरिता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समिती अंतर्गत करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत तसेच मुंबई शहराकरिता एक जिल्हा एक उत्पादन प्रकरणी, निर्यात प्रोत्साहनाकरिता तसेच निर्यातवाढीकरिता उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित निर्यातसंबंधी इत्यादी काही अडचणी असल्यास त्याबाबत कळविण्याबाबत निर्देश दिले.

४. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

# Government Of Maharashtra

महाराष्ट्र शासन

Office of the Joint 9Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai

उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,

Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.

विकास सेटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.

Tel.No. 25206199/25208182 Email: didic.mumbai@maharashtra.gov.in


37

दिनांक :- २६.०६.२०२३.

सा द र :-

मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्याकरिता झालेल्या एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई शहर करिता उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दिनांक १३.०६.२०२३ चे इतिवृत्त मान्यतेस्तव व स्वाक्षरीकरिता सादर,

उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

24/6/2023

| क्रमांक | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे |
|---|---|---|
| १. | संचालक, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, न्यु एक्सोलसियर बिल्डींग, ६ वा मजला, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई. ०१ | मुंबईला जागतिक स्तरावर युनिकॉर्नची गरज असल्याने शासनाने स्टार्टअप्समध्ये मार्गदर्शन केल्यास उत्पादनांच्या तुलनेत प्रचंड महसूल शासनास प्राप्त होईल. शासनाने एक जिल्हा एक उत्पादन सोबत एक जिल्हा एक सेवा संकल्पना विकसित केल्यास संस्थेच्या इनपूटसह सहभागी होणार असल्याचे नमूद केले आहे. तसेच एमएसएमई अंतर्गत काम करणा-या अकुशल कामगारांसाठी अद्ययावत कौशल्य तयार करण्याबाबत तसेच त्यासंदर्भात कौशल्य विभागाच्या महाराष्ट्र नोडल एजन्सीला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे नमूद केले आहे. बंद पडलेल्या तसेच आजारी उद्योगांना पुनरुज्जीवीत करुन आर्थिक समावेशन प्रणाली सुधारण्याबाबत नमूद केले आहे. तसेच सबसिडीकरिता क्लेम करणे. |
| २. | संचालक, सागरी उत्पादन निर्यातक, योगक्षेम, फलॅट क्रमांक ६०५, रिजेन्ट चेंबर्स, ६ वा मजला, जमनालाल बजाज रोड, नरीमन पॉईट, मुंबई. | जेम्स आणि ज्वेलरी घटक यांना निर्यातीबाबत प्रदर्शन भरविण्याबाबत व त्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबबात सुचविण्यात आले. निर्यातपदधती बाबत नवीनतम तंत्रज्ञान व कौशल्ये तयार करण्याबाबत, त्याकरिता समिती सदस्य यांनी चर्चासत्र आयोजित करुन निर्यातवाढीकरिता प्रयत्न करण्याबाबत निर्देश देण्यात आले. |
| ३. | संचालक, बेसिक केमिकल्स, कॉस्मेटिक्स अँड डायस एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल, झांसी कास्लेट, ४ था मजला, ७-कूपरेज रोड, मुंबई. ४००००१. | जिल्हयातील निर्यातदारांकरिता शासनाकडून कार्यशाळा किंवा मेळावे आयोजित करुन निर्यात लाभार्थी यांचेसोबत चर्चा करुन शासनामार्फत काही मदत असल्यास देण्याबाबत विनंती करण्यात आली. |
| ४. | संचालक, लेदर इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कार्पोरेशन, ४५, ५ वा मजला, बॉम्बे लाईफ बिल्डींग, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई. | लेदर उद्योगाच्या निर्यातवाढीसाठी, क्षमतावृध्दीसाठी प्रयत्न करण्याबाबत तसेच निर्यातीबाबत प्रदर्शन भरविण्याबाबत व त्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबबात सुचविण्यात आले. त्याबाबत काही अडचणी असल्यास तसे या कार्यालय लेखी कळविण्याबाबत सांगण्यात आले. निर्यातपदधती बाबत नवीनतम तंत्रज्ञान व कौशल्ये तयार करुन त्याकरिता समिती सदस्य यांनी चर्चासत्र आयोजित करुन निर्यातवाढीकरिता प्रयत्न करण्याबाबत सुचविण्यात आले. |
| ५. | लेदर गुड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, संत रोहीदास मार्ग, ओएनजीसी, धारावी, मुंबई. १७. | लेदरबाबत बनविण्यात येणारी सर्व उत्पादने ही हस्तनिर्मित असल्याने तसेच यंत्रसामुग्रीचा अभाव असल्याने व्यवसाय वाढविण्याकरिता शासनामार्फत काही मदत असल्यास देण्याबाबत विनंती करण्यात आली. |

33

मुंबई शहराकरिता प्रस्तावित निर्यात प्रचालन समिती बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कार्यवाही होण्याकरिता मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी निर्यातीमध्ये संबंधित असणाऱ्या स्टेक होल्डर यांचेकरिता निर्यात प्रोत्साहन परिषद, जिल्हा उद्योग केंद्र यांचे समवेत एकत्रितपणे निर्यातदारांकरिता चर्चासत्र तसेच प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करुन Capacity Building Programme करिता IEC अंतर्गत All EPC करिता IEC कॅम्प लावण्याबाबत तसेच सहाय्य करण्याबाबत निर्देशित करण्यात आले. तसेच एक जिल्हा एक उत्पादन करिता तसेच निर्यात प्रोत्साहनाकरिता उपस्थित असलेल्या संबंधित संस्था यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत तसेच Export Promotion करण्याकरिता उपाययोजना आखण्याबाबत होणा-या चर्चासत्र तसेच प्रदर्शनानुसार मा.जिल्हाधिकारी यांनी वरिष्ठ प्रकल्प सल्लागार, अर्न्स्ट अँड यंग एलएलपी यांना आदेशित केल्यानुसार सुधारीत कृती आराखडा सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच सदर समिती अंतर्गत निर्यातीसंदर्भात बैठकीस उपस्थित असलेल्या संस्थेस तसेच इतर अन्य संस्थेस काही अडचणी असल्यास त्याचे निराकरण करणे व त्याबाबत माहिती उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

* बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य :-

| | |
|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| २. | उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| ३. | उद्योग अधिकारी (मुंप्रावि), जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| ४. | संचालक, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, न्यु एक्सेलसियर बिल्डींग, ६ वा मजला, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई. |
| ५. | संचालक, जेम्स अँड ज्वेलरी एक्सपोर्ट कौन्सील, ए-डब्ल्यू-१०१०, टॉवर-ए, जी ब्लॉक, भारत डायमंड हाऊस, वांद्रे-कुर्ला संकुल, बीकेसी रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई. |
| ६. | संचालक, बेसिक केमिकल्स, कॉस्मेटिक्स अँड डायस एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल, झांसी कास्लेट, ४ था मजला, ७-कूपरेज रोड, मुंबई. |

| | |
|---|---|
| ७. | संचालक, लेदर इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कार्पोरेशन, ४५, ५ वा मजला, बॉम्बे लाईफ बिल्डींग, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई. |
| ८. | लेदर गुड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, संत रोहीदास मार्ग, ओएनजीसी, धारावी, मुंबई. |

क्रमांक उससं/मुंप्रावि/मुंबई शहर/जिनिप्रस/बैठक/२०२३/ दिनांक :-

प्रत माहितीस्तव सादर :-

३. मा जिल्हाधिकारी, मुंबई शहर
४. बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य, मुंबई शहर.

३५